# दोनशे वर्षांपूर्वीचे मराठी बायबल

(लेखकः रंजन केळकर, पुणे)

कलकत्त्याजवळ श्रीरामपूर नावाचे एक लहानसे उपनगरी स्टेशन आहे. तेथील तिकीट विक्रीच्या खिडक्यांसमोरच्या भिंतीवर मोठ्या अक्षरांत हे शब्द रंगविलेले आहेतः “Attempt great things for God, Expect great things from God.” हे उद्गार ज्यांनी काढले, ते रेव्हरेंड डॉक्टर विल्यम केरी, ह्यांनी श्रीरामपूर येथे १८०० ते १८३४ च्या काळात जे बहुमोल कार्य केले त्याचे संक्षिप्त वर्णन त्या बोधवाक्याखाली वाचावयास मिळते. विल्यम केरी हे आधुनिक भारतात आलेले पहिले इंग्रज मिशनरी होते. हुगली नदीच्या काठी श्रीरामपूर कॉलेजसाठी त्यांनी बांधलेली भव्य इमारत अजून उभी आहे. श्रीरामपूर कॉलेजला भेट देण्याची आणि तेथील ग्रंथालयात दोनशे वर्षे जतन करून ठेवलेले दुर्मिळ ग्रंथ बघण्याची संधी मला नुकतीच मिळाली. विशेष म्हणजे त्यात बायबलच्या पहिल्या मराठी भाषांतराची छापील प्रत पण होती.

विल्यम केरी ह्यांचा जन्म १७६१ मध्ये इंग्लंडमधील एका लहानशा गावी एका सामान्य कुटुंबात झाला. छोट्या विल्यमला त्याच्या वडिलांनी पादत्राणे बनवणाऱ्या एका कारखान्यात शिकाऊ उमेदवार म्हणून भरती केले. पण विल्यमने जोडे शिवता-शिवता दुसऱ्यांच्या मदतीने ग्रीक भाषेचा अभ्यास सुरू केला. इंग्रजीशिवाय अन्य भाषा शिकण्यात विल्यमला एक स्वाभाविक रुची वाटू लागली आणि लवकरच त्याने लॅटिन, हीब्रू, इटालियन, डच आणि फ्रेंच भाषांचे ज्ञान अवगत केले. १७८३ साली, तरूण विल्यम केरी ख्रिस्ती धर्माविषयीपण सखोल विचार करू लागले. त्यांनी बॅप्टिस्ट मिशनरी सोसायटी ह्या संस्थेच्या वतीने भारतास मिशनरी म्हणून जाण्याचा निश्चय केला आणि १७९३ मध्ये ते सहकुटुंब कलकत्त्यास येऊन पोहोचले. जहाजावरील प्रवासातच त्यांनी एका प्रवाशाकडून बंगाली भाषा पण शिकून घेतली.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा त्या काळी ख्रिस्ती धर्मप्रसारास सक्त विरोध होता. त्यामुळे अनेक वर्षे केरींनी मुदनावती येथे नीळ बनवणाऱ्या कारखान्याचे व्यवस्थापक म्हणून काम केले आणि आपला चरितार्थ चालवला. कंपनी सरकार आपल्याला देशाबाहेर घालवून देईल अशी केरींना भीती होती. तेव्हा त्यांनी श्रीरामपूर ह्या डेनमार्क देशाच्या वसाहतीत आश्रय घेण्याचे ठरवले. १० जानेवारी १८०० रोजी विल्यम केरी श्रीरामपूरला पोहोचले व त्यांनी श्रीरामपूर मिशन स्थापन केले.

श्रीरामपूरच्या मिशनरींनी बायबलचे आपले पहिले भाषांतर बंगालीत केले हे साहजिक होते. पण त्यानंतर लगेचच, विल्यम केरींनी स्वतः बंगाली, मराठी, उडिया आणि संस्कृत भाषांमध्ये भाषांतराचे काम हाती घेतले. मराठीतील भाषांतराच्या कामास १८०४ मध्ये सुरुवात झाली आणि नव्या करारातील पहिले पुस्तक म्हणजे संत मत्तयाचे शुभवर्तमान एका वर्षात छापून तयार झाले. १८११ साली, ७४४ पृष्ठांचा संपूर्ण मराठी नवा करार प्रसिद्ध झाला. त्यानंतर १८१३ ते १८१६ ह्या वर्षांत जुन्या कराराच्या पुस्तकांचे मराठी भाषांतर क्रमशः प्रसिद्ध करण्यात आले. १८२२ मध्ये चार शुभवर्तमानांची आणि १८२३ मध्ये नव्या कराराची दुसरी आणि सुधारित आवृत्ती काढली गेली.

केरींच्या मराठी बायबलच्या सुरवातीच्या पाच ओव्या अशा होत्याः ‘‘पहिले ईश्वराने स्वर्ग आणि पृथ्वीची सृष्टी केली. पृथ्वी शून्य आणि अस्थिरान्तरी होती आणि थलवटावर अंधार झाला आणि ईश्वराचा आत्मा पाण्यावर हलणारा झाला. तदनन्तर ईश्वराने म्हटले जे उजेड होवो त्याच्याने उजेड झाला. तेव्हां ईश्वराने पाहिले की तो उजेड उत्तम. तदनन्तर ईश्वराने दीप्ती आणि अंधकारास वेगळे केले. ईश्वराने उजेडाचे नांव दिवस आणि अंधाराचे नाव रात्री ठेवले. संध्याकाळ आणि प्रातःकाळ झाल्याने पहिला दिवस झाला.’’ हल्ली प्रचलित असलेल्या बायबलच्या भाषांतरात प्रकाश हा एकच शब्द वापरला गेला आहे. पण केरींनीं दीप्ती व उजेड अशा दोन पर्यायी शब्दांचा उपयोग केलेला आहे. बायबलच्या

कथानकाप्रमाणे सूर्याची उत्पत्ती प्रथम झालेली नव्हती. म्हणून दीप्ती हा सुंदर शब्द वापरून, जिचा सूर्याशी संबंध नाही अशा एका तेजोमय स्थितीचे वर्णन त्यांनी केले.

श्रीरामपूरच्या मिशनरींनी भारतीय भाषांत बायबलच्या भाषांतराचे जे काम केले ते खरोखरच अद्वितीय होते. तरी पण ते टीकाकारांच्या पसंतीस उतरले नाही. विल्यम केरी ह्यांचे स्वतःचे धर्मविषयक ज्ञान किती आहे आणि भारतीय भाषांवर त्यांचे खरोखरच प्रभुत्व आहे काय असेही प्रश्न विचारले गेले. भाषांतरात वापरलेली भाषा समजण्यास कठीण आणि वाङमयीन दृष्ट्या कनिष्ठ स्तराची आहे असे काही टीकाकारांचे मत होते.

ह्या टीकेस उत्तर म्हणून विल्यम केरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बायबलच्या भाषांतरासाठी एका समान शिस्तवार कार्यपद्धतीचा अवलंब केला. ते प्रथम प्रत्येक भाषा स्वतः शिकून घेत आणि त्या भाषेचे व्याकरण, शब्दावली व शब्दकोश तयार करीत. त्या त्या भाषेतील पंडितांकडून भाषांतराची सुरुवात करून घेत आणि भाषांतराची फेरतपासणी व मूळ उताऱ्याशी पुन्हा तुलना करीत. विल्यम केरी व त्यांच्या सहकाऱ्यांची जिद्द एवढी होती की, श्रीरामपूर मिशनने आपला स्वतःचा छापखाना काढला, खिळे बनविण्यासाठी स्वतःची ओतशाळा उभारली आणि पुस्तक छपाईसाठी योग्य प्रकारचा कागद श्रीरामपूर येथेच बनू लागला.

मिशनच्या कामात विल्यम वॉर्ड हे मुद्रक आणि जॉशवा मार्शमन हे शिक्षक, ह्यांनी विल्यम केरी ह्यांना उत्तम साथ दिली आणि ह्या तिघांना श्रीरामपूरची त्रयी असे नाव मिळाले. ह्या सर्वांनी आणि इतर अनेकांनी मिळून १८००-१८३२ ह्या काळात एकंदर ४० भाषांत बायबलचे भाषांतर केले. ह्यांत पंजाबी, आसामी, गुजराती, तेलगू, कन्नड, बृजभाषा, मुलतानी, काश्मिरी, डोगरी, मारवाडी, खासी, कुमाऊ अशा निरनिराळ्या भारतीय भाषांचा व पोटभाषांचा, तसेच बर्मी, मलाय, चिनी, नेपाळी, पुश्तू, फारसी वगैरे परदेशी भाषांचापण समावेश होता.

१८०१ साली भारताचे इंग्रज गव्हर्नर-जनरल रिचर्ड वेलस्ली ह्यांनी कलकत्त्यात फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना केली व त्यावर बंगाली भाषेचे प्राध्यापक म्हणून काम करण्यास केरी ह्यांना आमंत्रित केले. १८०७ साली विल्यम केरी ह्यांना अमेरिकेतील ब्राउन विद्यापीठाने आपली 'डॉक्टर ऑफ डिव्हिनिटी' ही पदवी प्रदान करून त्यांना गौरवित केले. १८१८ मध्ये श्रीरामपूर मिशनने एका भव्य इमारतीत आपले स्वतःचे कॉलेज उभारले. १८२९ साली श्रीरामपूर कॉलेजला कला व ईश्वरविज्ञान शाखांत आपल्या स्वतःच्या पदव्या बहाल करण्याची डेनमार्कच्या राजांनी एका विशेष चार्टरद्वारे मान्यता दिली.

'फ्रेण्ड ऑफ इण्डिया' नावाचे भारत देशातील पहिले वृत्तपत्र श्रीरामपूर येथे सुरू झाले आणि त्याचा पहिला अंक ३० एप्रिल १८१८ रोजी प्रकाशित झाला. त्याच वर्षी 'दिग्-दर्शन' नामक बंगाली मासिक आणि 'समाचार-दर्पण' नामक बंगाली साप्ताहिकाचे प्रकाशनही सुरू झाले. १८१९ साली 'दिग्-दर्शन' ची हिंदी आवृत्तीही निघू लागली. विल्यम केरी ह्यांनी देशातील अज्ञान, अनाक्षरता आणि अंधविश्वास ह्यांच्याविरुद्ध जणू एक मोहीम उभारली होती. केरींना धर्मप्रसाराबरोबर विज्ञानप्रसार करण्यातही विशेष रुची होती. त्यांनी प्राथमिक शाळा काढली, वनस्पती उद्यान वाढवले, पुस्तकालय बनवले, नैसर्गिक इतिहासाचे म्यूझियम उभारले, वेधशाळा स्थापन केली. १८२० साली त्यांनी स्वतः ॲग्रिहॉरटिकल्चरल सोसायटी ऑफ इण्डिया ह्या नवीन स्वतंत्र संस्थेचीही स्थापना केली.

केरींच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवनात अनेक अडचणी येत राहिल्या. १८३० साली केरी फोर्ट विल्यम कॉलेजच्या प्राध्यापकपदावरून सेवानिवृत्त झाले. केरींची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. बंगाली भाषेतील नव्या कराराच्या सुधारित भाषांतराचे काम त्यांनी कसेबसे संपवले आणि ९ जून

१८३४ रोजी, त्यांच्या जीवनयात्रेची समाप्ती झाली. श्रीरामपूर येथे विल्यम केरी ह्यांच्या कबरेवर असा शिलालेख आहेः
“A wretched poor and helpless worm, On Thy kind arms I fall.”

--------------